# देगलूर महाविद्यालयाचे दोन खेळाडू स्पर्धेसाठी चेन्नईत

देगलूर, ता. ८ (बातमीदार) : चेन्नई तमिळनाडू येथे होणाऱ्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठीय मैदानी स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या संघात देगलूर महाविद्यालय, देगलुरचे हेमनार अनिल ४०० मी. व घंटेवाड मारोती १०० मी. धावणे स्पर्धेत विद्याविठातून सर्वप्रथम येत अखिल भारतीय आंतर विद्यापीठीय मैदानी स्पर्धेत निवड झाली.

खेळाडूंचे प्रशिक्षक म्हणून डॉ. निरजकुमार उपलंचवार व प्रा. हाके सिताराम यांनी काम पाहिले. खेळाडूंचे अड्त व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, देवेंन्द्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य चमकुडे, डॉ. बी.आर. कत्तुरवार, प्रा. संग्राम पाटील, गोविंद जोशी यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



**देगलूर :** देगलूर महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची विद्यापीठीय चेन्नई स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

Scanned with OKEN Scanner